# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, फ प्रभाग कार्यालय

## कार्यपत्रिका क्रमांक १२

## सभावृत्तांत

दिनांकः- ११/३/२०१५ वेळ. दुपारी १२.०० वा.

---

पिंपरी चिंचवड महानगसालिकेच्या फ प्रभाग समितीची मासिक सभा दिनांक ११/३/२०१५ रोजी दुपारी १२.०० वाजता फ क्षेत्रीय कार्यालयातील "राजर्षी शाहु महाराज सभागृहात" आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य/सदस्या उपस्थित होते.

१. मा. थोरात वनिता एकनाथ सभापती
२. मा. पौर्णीमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
३. मा. म्हेत्रे सुरेश रंगनाथ
४. मा. स्वाती प्रमोद साने
५. मा. जाधव साधना रामदास
६. मा. पवार संगीता शाम
७. मा. बो-हाडे शुभांगी संजय
८. मा. (चिखले) मराठे अश्विनी अजित
९. मा. ठाकरे मंदाकिनी अर्जुन

याशिवाय श्री.दिलीप गावडे क्षेत्रीय अधिकारी, श्री.विजय वाघमारे प्रशासन अधिकारी, श्री.पी.जी.जाधव लेखाधिकारी, श्री.सतिश इंगळे कार्य.अभियंता (स्था), संदेश चव्हाण कार्य. अभियंता (वि), श्री.प्रदीप पुजारी उप.अभियंता (झोनिपु/स्था), श्री.राजेंद्र राणे, श्री.विशाल कांबळे, श्री.डी.बी.सपताळे, आबासाहेब ढवळे उप अभियंता, श्री. दाते टी.एच सहा.आरोग्य अधिकारी, श्री.पी.एम.गायकवाड उदयान अधिक्षक, श्री.फुगे एन.जे. क्रीडा पर्यवेक्षक, क्रीडा विभाग, श्री.मोरे सी.सी उदयान सहाय्यक, श्री.गायकवाड टी.डी. उदयान सहाय्यक, श्री.गायकवाड एस.पी. उदयान सहाय्यक, श्रीम.पी.पी.गाडेकर, मुख्य लिपिक इ. अधिकारी सभेस उपस्थित होते.

मा.सभापती यांनी सर्वांचे स्वागत करुन सभा सुरु करावी असे सांगितले. दि.११/२/२०१५ कार्यपत्रिका क्र. ११ च्या सभेचा सभावृत्तांत कायम करणेत आला.

**<u>सन्मा.सदस्य/सदस्या यांनी खालील मुद्दयांवर चर्चा केली</u>**

**<u>मा.स्वाती साने</u>**:- प्रभाग क्र.३ चिखली, येथे पाण्याचा मोठा प्रश्न आहे. पाणी वेळेवर येत नाही. रोज १ टँकर पाणी देणार होते. तेही दिले जात नाही. टॉयलेट ब्लॉक स्वच्छ करण्यासाठी नळ नाही. वेळेवर स्वच्छता होत नाही. रामदासनगर येथे २" पाईपलाईन टाका. सोनवणेवस्ती येथे ड्रेनेजलाईन आवश्यक आहे. ड्रेनेजलाईन नसल्यामुळे अनारोग्य वाढत आहे.

**मा. क्षेत्रीय अधिकारी:-** या मागण्याबाबत पाणीपुरवठा आणि जलनि:सारण विभागाचे संबंधित श्री.विजय शिंदे (कनिष्ठ अभियंता), श्री.आबासाहेब ढवळे (उपअभियंता) यांनी सत्वर कार्यवाही करावी.
श्री.विजय शिंदे:- (कनिष्ठ अभियंता) संडास ब्लॉकसाठी १३ मार्चपर्यंत नळ जोड दिला जाईल. असे सांगितले.

**मा.साधना जाधव**:- प्रभाग क्र.५ जाधववाडी कुदळवाडी येथील रोकडेवस्ती, जाधववाडी मंदीराच्या मागे पाण्याच्या टाक्या आहेत. त्याला चिरा पडलेल्या आहेत. दरवाजे तुटलेले आहेत. त्या त्वरीत बदलणेत याव्यात. तसेच पाणी पंपींगसाठी जनरेटर अनेकदा डिझेलमुळे बंद असतो. .डिझेलच्या कारणामुळे जनरेटर बंद पडता कामा नये. नवीन मोटर बसविणेत यावी. चौकांमध्ये, शाळेजवळ गतिरोधक गरजेचे आहे ते लवकर तयार करावेत. उदयान अदयापी विकसित केले नाही ते विकसित करावे आणि मुलांसाठी नवीन खेळणी बसवावीत.

**श्री.पी.एम.गायकवाड:-** उदयान अधिक्षक यांनी प्रस्ताव झालेला आहे. सध्या तो अभिप्रायासाठी मुलेप विभागाकडे पाठविला आहे. दोन ते तीन महिन्याच्या आत नवीन खेळणी बसविली जातील.

**मा.क्षेत्रीय अधिकारी**:- पाण्याच्या टाक्यांचे दरवाजे वेल्डींग करुन त्वरीत बसवावेत.

**मा.सतिश इंगळे**:- टाक्या बसवुन झालेनंतर दरवाजे बसविणे सोईस्कर होईल.

**मा.मंदाकिनी ठाकरे:-** प्रभाग क्र. २८ मासुळकर कॉलनीतील रस्त्यावर जे भाजी व फळे व्यवसाय करतात व ज्यांनी हॉकर्स अंतर्गत अर्ज सादर केलेले आहेत. त्या पात्र अर्ज धारकांना मासुळकर भाजी मंडईतील रिक्त गाळे ३ वर्ष कालावधीसाठी करारनामा करुन भाडयाने देणेत यावेत.

**मा.क्षेत्रीय अधिकारी**:- लिलाव पध्दतीने करता येते का हे पाहुन घेवुन, तशी जाहिर नोटीस प्रसिध्द करु. हॉकर्स झोन मधील पात्र लाभार्थींना बसविणे व पुनर्वसन करणेबाबतही विचार करु. सदर कार्यवाहीस कार्योत्तर मान्यता घेण्यात येईल.

**मा.मंदाकिनी ठाकरे**:- ड्रेनेज लाईनचे कामकाज अजुन झालेले नाही.

**श्री. आबासाहेब ढवळे**:- येत्या आठ दहा दिवसात हे काम केले जाईल.

**<u>उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.</u>**

विषय क्र.१ कोयनानगर येथील उदयानातील श्री.विघ्नहर्ता गणपती मंदिरात धार्मिक व सांस्कृतीक कार्यक्रमास कायम स्वरुपी परवानगी देणेबाबत.
मा.वनिता थोरात व मा.शुभांगी बो-हाडे यांचा प्रस्ताव

विषय क्र.२ ठराव क्र. ३५ विषय नं. २ दिनांक १०/९/२०१४ मध्ये विघ्नहर्ता गणेश मार्ग ऐवजी श्री.विघ्नहर्ता गणपती मार्ग दुरुस्ती करणेबाबत
मा. वनिता थोरात व मा.शुभांगी बो-हाडे यांचा प्रस्ताव

विषय क्र.३ इनप्रिया मॉल समोरील फायबर मुतारी काढून टाकणेबाबत
मा.अश्विनी मराठे (चिखले) व मा.स्वाती साने यांचा प्रस्ताव

विषय क्र.४ निगडी गावठाण मधील चौकास किरण सुदाम काळभोर असे नाव देणेबाबत
मा. अश्विनी मराठे (चिखले) व मा.स्वाती साने यांचा प्रस्ताव

विषय क्र.५ सार्वजनिक वाचनालयाला “लोकमान्य बाळ गंगाधर टिळक” असे नांव देणेबाबत.
मा. अश्विनी मराठे (चिखले) व मा.स्वाती साने यांचा प्रस्ताव

विषय क्र.६ निगडी अंकुश चौक मधून साईनाथ नगर जाणा-या रस्त्यास “कै.बाबुराव गणपत काळभोर मार्ग” असे नांव देणेबाबत.
मा. अश्विनी मराठे (चिखले) व मा.स्वाती साने यांचा प्रस्ताव

विषय क्र.७ दि.९/११/२०१२ चे प्रभाग समिती बैठकीतील मंजूर ठराव क्रमांक १०७ मधील चिखली मोरेवस्ती, म्हेत्रेवस्ती येथील नव्याने बांधलेल्या इमारतीमध्ये इयत्ता १ ते ७ वी पर्यंतचे प्राथमिक विदयालयाचे शैक्षणिक कामकाज चालू असून सदरचे शाळेस ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले प्राथमिक विदयालय अशी दुरुस्ती करणेबाबत
मा.मंदाकिनी ठाकरे व मा.पौर्णीमा सोनवणे यांचा प्रस्ताव

ठराव क्र.५६ विषय क्र.१

दि.११/३/२०१५ विभाग:-

सुचक:- मा.मंदाकिनी ठाकरे अनुमोदक:- मा.पौर्णिमा सोनवणे

संदर्भ:- मा.मंदाकिनी ठाकरे व मा.पौर्णिमा सोनवणे यांचा दि. ११/३/२०१५ चा प्रस्ताव

विषय:- डब्ल्यू सेक्टर ते मंडई पर्यंत असलेल्या रस्त्याला स्व.बाबुराव ठाकरे (गुरुजी) मार्ग असे नांव देणेबाबत

प्रभाग क्र. २८ मासुळकर कॉलनी येथे डब्ल्यू सेक्टर ते मंडईपर्यंत असलेल्या रस्त्याला स्व.बाबुराव ठाकरे (गुरुजी) मार्ग असे नांव देण्याचा विषयास माझे सहकारी मा.समीर मासुळकर यांनी मान्यता न दिल्यामुळे सदर विषय दप्तरी दाखल करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----

**<u>सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.</u>**

ठराव क्र.५७ विषय क्र.२

दि.११/३/२०१५ विभाग:-

सुचक:-मा.वनिता थोरात अनुमोदक:- मा. शुभांगी बो-हाडे

संदर्भ:-मा. वनिता थोरात व मा. शुभांगी बो-हाडे यांचा दि. ११/३/२०१५ चा प्रस्ताव

विषय:- कोयनानगर येथील उदयानातील श्री.विघ्नहर्ता गणपती मंदिरात धार्मिक व सांस्कृतीक कार्यक्रमास कायमस्वरुपी परवानगी देणेबाबत

पिंपरी चिंचवड मनपा हद्दीत कोयनानगर येथील मनपाचे सार्वजनिक उदयानात श्री.विघ्नहर्ता गणपती मंदीर असुन सन १९९८ पासुन कोयनानगर कृती समितीच्या माध्यमातुन सर्व धर्मिय धार्मिक कार्यक्रम, गणेशोत्सव, कोजागिरी, वर्धापन दिवस, गुणगौरव, कार्यक्रम घेत आहे. कार्यक्रम घेत असताना आवाजाचा किंवा इतर कुठल्याही बाजुचे लोकांना त्रास होणार नाही यांची काळजी घेत आहेत.

तरी कोयनानगर कृती समितीला कार्यक्रम घेण्यास कायमस्वरुपी परवानगी देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्र.५८ विषय क्र.३

दि.११/३/२०१५ विभाग:-

सुचक:-मा.वनिता थोरात अनुमोदक:- मा. शुभांगी बो-हाडे

संदर्भ:- मा.वनिता थोरात व मा. शुभांगी बो-हाडे यांचा दि.११/३/२०१५ चा प्रस्ताव

विषय:- दिनांक १०/९/२०१४ ठराव क्र.३५ विषय नं.२ मध्ये दुरुस्ती करणेबाबत

दिनांक १०/९/२०१४ रोजी ठराव क्र.३५ विषय क्र.२ मध्ये **“विघ्नहर्ता गणेश मार्ग”** असे नामकरण झालेले आहे. त्याऐवजी **“श्री. विघ्नहर्ता गणपती मार्ग”** नामकरण करणेस मान्यता देणेत येत आहे..

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्र.५९ विषय क्र.४

दि.११/३/२०१५ विभाग:-

सुचक:-मा. अश्विनी मराठे (चिखले) अनुमोदक:- मा. स्वाती साने

संदर्भ:- मा. अश्विनी मराठे (चिखले) व मा. स्वाती साने यांचा दि.११/३/२०१५ चा प्रस्ताव

विषय:- इनप्रिया मॉल समोरील फायबर मुतारी काढून टाकणेबाबत

निगडी गावठाण मधील जुना एन एच ४ रस्त्याशेजारी व इनप्रिया मॉल जवळ फायबर मुतारी आहे. त्या मुतारीची स्वच्छता कधीही नसते ती फायबर मुतारी अत्यंत वाईट अवस्थेत तुटलेली आहे. त्यामुळे त्या परिसरात सर्वत्र दुर्गंधी पसरलेली आहे, त्या मुतारीची दुरावस्था झालेली आहे त्यामुळे नागरिकांमध्ये व महिलांमध्ये असंतोष निर्माण झाला आहे. तरी सदर फायबर मुतारी लवकरात लवकर काढून टाकणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्र.६० विषय क्र.५

दि.११/३/२०१५ विभाग:-

सुचक:-मा.अश्विनी मराठे (चिखले) अनुमोदक:- मा. स्वाती साने

संदर्भ:-मा.अश्विनी मराठे (चिखले) व मा. स्वाती साने यांचा दि.११/३/२०१५ चा प्रस्ताव

निगडी मधील मगर गिफ्ट हाऊस जवळ जो चौक आहे त्या चौकास **“कै.किरण सुदाम काळभोर चौक”** असे नांव देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्र.६१ विषय क्र.६

दि.११/३/२०१५ विभाग:-

सुचक:-मा.अश्विनी मराठे (चिखले) अनुमोदक:- मा. स्वाती साने

संदर्भ:- मा. अश्विनी मराठे (चिखले) व मा. स्वाती साने यांचा दि.११/३/२०१५ चा प्रस्ताव

निगडी गावठाण बहार सोसायटी जवळ पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने सार्वजनिक वाचनालय उभारण्यात आले आहे. या वाचनालयाला **“लोकमान्य बाळ गंगाधर टिळक वाचनालय”** असे नांव देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्र.६२ विषय क्र.७

दि.११/३/२०१५ विभाग:-

सुचक:-मा.अश्विनी मराठे (चिखले) अनुमोदक:- मा. स्वाती साने

संदर्भ:- मा. अश्विनी मराठे (चिखले) व मा. स्वाती साने यांचा दि.११/३/२०१५ चा प्रस्ताव

विषय:- निगडी अंकुश चौक मधून साईनाथ नगर येथे जाणा-या रस्त्यास **कै.बाबुराव गणपत काळभोर मार्ग** असे नांव देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्र.६३ विषय क्र.८

दि.११/३/२०१५ विभाग:-

सुचक:-मा.मंदाकिनी ठाकरे अनुमोदक:- मा. पौर्णिमा सोनवणे

संदर्भ:-मा.मंदाकिनी ठाकरे व मा.पौर्णिमा सोनवणे यांचा दि. ११/३/२०१५ चा प्रस्ताव

विषय:-दि. ९/११/२०१२ चे प्रभाग समिती बैठकीतील मंजूर ठराव क्रमांक १०७ मधील दुरुस्तीबाबत

चिखली मोरेवस्ती, म्हेत्रेवस्ती येथील नव्याने बांधलेल्या इमारतीमध्ये इयत्ता १ ली ते ७ वी पर्यंतचे प्राथमिक विद्यालयाचे शैक्षणिक कामकाज चालू असून सदरचे शाळेस "सावित्रीबाई फुले प्राथमिक विदयालय" असे नामकरण करणेस उपसुचनेसह दि. ९/११/२०१२ ठराव क्र. .१०७ अन्वये मान्यता देण्यात आली होती. सदर ठरावात खालीलप्रमाणे दुरुस्ती सुचविणेत आली.

चिखली मोरेवस्ती, म्हेत्रेवस्ती येथील नव्याने बांधलेल्या इमारतीमध्ये इयत्ता १ ली ते ७ वी पर्यंतचे प्राथमिक विद्यालयाचे शैक्षणिक कामकाज चालू असून सदरचे शाळेस सावित्रीबाई फुले प्राथमिक विदयालय ऐवजी **"ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले प्राथमिक विदयालय"** असे नामकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपलेचे जाहीर केले. सही/-

(वनिता एकनाथ थोरात)

सभापती

जा.क्र.फक्षेका/सभा/कावि/४०/२०१५ फ प्रभाग समिती

दि.११/३/२०१५ सही/-

प्रशासन अधिकारी तथा

सचिव (सभाशाखा)

फ क्षेत्रीय कार्यालय

प्रत - सर्व संबंधित शाखा प्रमुख व शाखाधिकारी

यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना